Newspaper: Maharashtra Times

Article date: 24-02-2017

Hunar 2017 post-event article

# 'हॉबी'वाला 'हुनर'





आदेश पुरंदरे, कॉलेज क्लब रिपोर्टर

मोठा फेस्ट म्हटलं की नाच, गाणी, स्पोर्ट्स असे इव्हेंट पाहिजेतच. पण माटुंग्याच्या पोदार कॉलेजमध्ये नुकताच झालेला 'हुनर' हा हॉबी फेस्ट याला अपवाद ठरला. विद्यार्थ्यांचे हुनर म्हणजे छंद सर्वांसमोर आणण्यासाठी साकारलेला हा एक वेगळाच फेस्टिव्हल पोदारमध्ये पार पडला. या फेस्टचा 'महाराष्ट्र टाइम्स' मीडिया पार्टनर होता.

विद्यार्थ्यांची वाढती संख्या आणि नवीन इव्हेंट्सची वाढती मजा यामुळे एक दिवसाचा ह्या फेस्ट पोदारकरांसाठी आवडीचा विषय ठरला. यंदाच्या 'हुनर-द स्पार्क इन यु' या थीमवर आधारित निरनिराळे सहा इव्हेंट्स रंगले. 'स्क्रीबलर्स' या इव्हेंटमध्ये स्पर्धकांनी आयत्या वेळी दिलेल्या शब्दांचा वापर करून उत्तम कविता केल्या. 'स्मार्ट प्ले' या मोबाइल गेमिंग इव्हेंटला आणि 'विटीयेस्ट ऑफ देम ऑल' या क्वीझ स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. 'कॉमेडी सर्किट' या स्टँड अप कॉमेडीच्या इव्हेंटला स्पर्धकांनी विनोदी किस्से सांगून प्रेक्षकांना पोट धरून हसायला भाग पाडलं. अभ्यासू आणि मजामस्तीच्या रोजच्याच इव्हेंट्सपेक्षा असं काहीतरी वेगळ करायची आमची खूप इच्छा होती आणि हा मनापासून केलेला हुनरचा पहिलाच प्रयत्न हटके ठरला असं हुनरच्या टीमने सांगितलं.

### मज्जा काही न्यारीच

'हुनर' या फेस्टद्वारे नेहमीपेक्षा काहीतरी वेगळं बघायला मिळालं. विद्यार्थ्यांच्या विविध हॉबी आणि कलेक्शन्स अगदी अप्रतिम होत्या. सर्व स्पर्धकांना आणि टीम हुनरला फेस्टसाठी आणि पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा'

**- प्राजक्ता कोळी,** वेबस्टार

### प्रदर्शन ठरलं हिट

फेस्टमध्ये सर्वाधिक गर्दी जमली ती 'रिव्हील युअर कलेक्शन्स' हे प्रदर्शन बघायला. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी छंद म्हणून जमवलेली दुर्मिळ नाणी, नोटा, स्टॅम्प्स यांचे स्टॉल होते. याचबरोबर ओरिगामी आणि विविध चित्रांचाही प्रदर्शनात समावेश होता. यामध्ये एका स्टॉलवर विद्यार्थ्याने फेस्टला उपस्थित युट्यूब स्टार प्राजक्ता कोळीचं पोर्ट्रेट बनवून तिला सरप्राईज दिलं.